# लग्नगाठी पडतात स्वर्गात !

ना. सी. फडके

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**लग्नगाठी पडतात स्वर्गात ! : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २३०/-

# लग्नगाठी पडतात स्वर्गात !

# १

'हॅलो! मी जयश्री बोलते आहे.'

'हां हां मी बोलतो आहे जयश्रीबाई-'

नानबा कोठारेंचा आवाज जयश्रीबाईंनी सहज ओळखला. त्या हसल्या आणि म्हणाल्या, 'काय म्हणता नानबा! थिएटरवरूनच बोलत आहात ना? कशी काय गर्दी आहे आजच्या प्रयोगाला?'

नानबा म्हणाले,'गर्दी काय विचारता? इंग्रजीत ज्याला Evergreen म्हणतात तसं सदा तरुण आहे तुमचं हे नाटक. प्रत्येक प्रयोग हाऊसफुल होतो आहे. आजचा हा चाळीसावा प्रयोग! तो खूप थाटामाटात करणार आहोत. तुमचा सत्कार करणार आहोत-'

जयश्रीबाई हसल्या आणि म्हणाल्या 'माझं कौतुक कारण्यासाठी तुम्ही काय कराल ते खरं. एवढं सांगण्यासाठीच का फोन केलात?'

'नाही नाही, फोन केला तो वेगळ्याच कारणासाठी. कुणी तरी एक महत्त्वाची बातमी सांगितली मला, आणि मी मनाशी ठरविलं, बाईंनाच विचारूया बातमी खरी का खोटी.'

'कोणती बातमी म्हणता?'

'नव्या नाटकाचा तिसरा अंक लिहून पुरा केलात म्हणे.'

'कुणी सांगितलं तुम्हाला?'

'रंगपट साप्ताहिकाचा संपादक-'

‘तो मन्या लाड होय?’

‘हां हां तोच. आत्ताच रंगपटात आला होता तो. तो म्हणाला, जयश्रीबाईंनी नवं नाटक पूर्ण केलं. आणि पुढं म्हणाला, की हे नवं नाटक तुम्ही आमच्या ‘रंगविलास’ला नाही देणार. ‘नाट्यभूषण’ला देणार आहात–’

‘दोन्ही बातम्या खोट्या आहेत नानबा. नाटक अजून पूर्ण केलेलं नाही. आणि तुमच्याखेरीज दुसऱ्या कुणाला मी ते देणारही नाही. त्या मन्या लाडाच्या बोलण्यावर काय जाता तुम्ही? हे वर्तमानपत्रवाले हव्या त्या खोट्या बातम्या उठवतात.’

‘होय, हेही खरचं. पण मन्या लाडानं सांगितलेली बातमी ऐकून मी चटपटून गेलो होतो. आता तुमचं बोलणं ऐकून बरं वाटलं. हे पाहा जयश्रीबाई, तुम्ही नवं नाटक लवकर पुरं केलं पाहिजे. आणि अधिक महत्त्वाची गोष्ट ही की ते तुम्ही आम्हालाच दिलं पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही नाट्यसंस्थेला ते देण्याचा विचार तुम्ही केलात तर आम्हाला फार दुःख होईल. तुमचा रागदेखील येईल–’

जयश्रीबाई थोड्या हसल्यां आणि म्हणाल्या, ‘नाही नाही. दुःख आणि राग करण्याची वेळ तुमच्यावर येऊ देणार नाही. तुम्ही माझ्या एका नाटकाचं इतकं कौतुक केलं आहे की तुमच्याशी इमान राखलंच पाहिजे मला.’

‘असं काही तुम्ही बोललात की आम्हाला शरमल्यासारखं होतं. तुमच्या या नाटकाच आम्ही कौतुक ते काय करीत आहोत. आपल्या गुणांनीच तुमचं हे नाटक गाजत आहे; पण एवढं खरं की तुमचं नवं नाटक आम्हालाच मिळालं पाहिजे.’

‘मिळेल, मिळेल.’

‘तुमचे हे शब्द ऐकून फार आनंद झाला. आता मन्या लाडाला विचारतो की जयश्रीबाईंनी नवं नाटक पुरं केलं आणि त्या ते नाटक ‘रंगविलास’ला न देता ‘नाट्यभूषणा’ला देणार आहेत या बातम्या कुणी सांगितल्या तुला? बाप दाखव नाही तर श्राद्ध कर.’

जयश्रीबाई खदखदून हसल्या, आणि म्हणाल्या ‘ठीक, ठीक. विचारा. पण नानबा, या वर्तमानपत्रावाल्याना बापही नसतो, आणि ते श्राद्ध करायला तयारही नसतात. आणि मन्याला तुम्ही कितीही छेडलंत तरी तो आपल्या साप्ताहिकात या दोन्ही खोट्या बातम्या छापल्याखेरीज राहाणार नाही.’

‘होय, तेही खरंच म्हणा.’



‘बऽ रं आणखी काय? तुमच्या ‘रंगविलास’ची सारी मंडळी ठीक आहेत ना? हां हां, माझी तब्येत उत्तम आहे. आँ? नाटक पुरं केव्हा करणार म्हणता? ते मात्र नक्की सांगता येत नाही. काय झालंय डोक्याला कुणास ठाऊक. चांगलासा शेवट सुचतच नाही. स्फूर्ती स्फूर्ती म्हणून काही म्हणतात ना? ती होतच नाहीः कल्पनेच्या घोड्यानं बैठकच मारली आहे. चाबकाचे कितीही फटके मारले तरी उठतच नाही; पण घाई करणार नाही–’

नानबा म्हणाले, ‘छे, छे, घाई करू नकाच. तुमच्या नव्या नाटकाचे दोन अंक ऐकले ते फारच सुंदर वठले आहेत. या नाटकाचा शेवटही तसाच मस्त झाला पाहिजे. नाटकाला नावही अगदी मस्त शोधून काढा. सारी भट्टी उत्तम जमली पाहिजे. घाई करू नका–’

जयश्रीबाई म्हणाल्या, ‘नाही, घाई नाहीच करीत. बैठक मारून बसलेलं स्फूर्तीचं घोडं लवकर म्हणा, उशिरा म्हणा केव्हा तरी उठेलच की. केव्हा तरी डोकं काम देऊ लागेलच की. मग सुटेल आपोआप कल्पनेची निरगाठ आणि सुचेल नाटकाचा शेवट. मग एका बैठकीत तिसरा अंक लिहून मोकळी होईन. नाटकाच्या अखेरीला ‘समाप्त’ अशी अक्षरं लिहिली की लगेच तुम्हाला फोन करून कळवीन. होय, होय लक्षात ठेवीन. हां हां, नंतर ठरवू नाटक वाचण्याचा दिवस. आं? आणखी काही नाही. गुड् नाईट्.’

जयश्रीबाईंनी टेलीफोन बंद केला...त्या आपल्या खोलीत गेल्या. थोड्या वेळापूर्वी फोन घेण्याकरिता त्या उठल्या होत्या, तेव्हा त्यांनी नाटकाच्या तिसऱ्या अंकाची वही पुढ्यात घेतली होती, आणि नाटकाची अखेरी कशी करावी याचाच विचार करीत होत्या...आता नानबा कोठारे यांच्याशी बोलून परत येऊन टेबलापुढच्या खुर्चीवर त्या बसल्या, आणि बरेच दिवस रखडून राहिलेल्या तिसऱ्या अंकाचा विचार करू लागल्या.

पण माणसाचं मन म्हणजे एक विचित्र ‘ओढाळ गुरू’ आहे. त्याला अमक्याच दिशेनं जायला लावता येत नाही. इ्या इ्या करून त्याला कितीही हाकलं तरी ते ऐकत नाही. त्याची लहर लागेल त्या दिशेनं ते जात राहातं.

नाटकाचा तिसरा अंक कसा लिहावा त्याचा विचार करण्याच्या हेतूनं जयश्रीबाई टेबलाशी बसल्या खऱ्या; परंतु त्यांचे विचार वेगळ्याच दिशेनं जाऊ

लागले. ज्या टेबलाशी त्या बसलेल्या होत्या त्याला उंची बिलोरी आरसा लावलेला होता. जयश्रीबाईंना स्वतःचं प्रतिबिंब दिसत होतं...त्या प्रतिबिंबाकडे बघून त्या विचारू लागल्या, जिचं एक नाटक नानबा कोठारेंच्या 'रंगविलास'च्या रंगमंचावर गाजत आहे, आणि जिच्या पुढच्या नाटकाकडे रसिक चाहत्यांचे डोळे लागलेले आहेत, ती जयश्री केदारच का तू? तू नाटककर्ती झालीस हे एक नवलच म्हटलं पाहिजे! नाटक लिहिण्याची इच्छा तुला होईल असं तीन वर्षांपूर्वी कुणाला तरी वाटलं होतं का?...कुणाला तरी कशाला, तुझं तुला तरी वाटलं होतं का? आणि तुझं पहिलं नाटक साफ पडलं तेव्हा अपयशाचा धसका घेऊन पुन्हा म्हणून नाटकाच्या वाटेला कधी जायचं नाही असा जो निश्चय तू केला होतास तो मोडून दुसरं नाटक तू लिहिशील असं तरी तुझं तुलाच वाटलं होतं का?...

आरशातल्या प्रतिबिंबाला उद्देशून तिनं फेकलेले प्रश्न जणू प्रतिबिंबरूपी जयश्रीला समजले, आणि तिनं उत्तर दिलं, मी नाटक लिहीन असं माझं मलाच कधी वाटलं नव्हतं हे खरं, माझं पहिलं नाटक पडल्यावर मी चांगलाच धसका घेतला होता हेही खरं; पण तू एक गोष्ट विसरतेस. माझ्या लहानपणी मी पुष्कळ नाटकं पाहिली, एवढंच नव्हे तर नाटकी जगाशी माझा पुष्कळच संबंध आला होता. माझे वडील विमा एजंटाचा व्यवसाय करीत होते; पण गद्य आणि संगीत नाटकं करणाऱ्या साऱ्या नाटक मंडळ्यांशी त्यांचे दृढ मैत्रीचे संबंध होते. पुष्कळ नामांकित नाटकी माणसं माझ्या वडिलांकडे येत असत. आमचं घर म्हणजे नाटकवाल्या माणसांची गप्पांच्या बैठकीची एक आवडती जागा होती. माझ्या लहानपणीचा एक फोटो मी जपून ठेवला आहे. त्या फोटोत बालगंधर्वांनी मला कडेवर घेतलेलं आहे. माझे बालपणातले ते मंतरलेले दिवस मला अजूनही चांगले आठवतात, त्या दिवसांच्या साऱ्या आठवणी सांगायच्या म्हटलं तर एक ग्रंथच होईल...

✦✦✦



# २

स.न.वि.वि.

श्री. हेमंतराव ऊर्फ बाबासाहेब सामंत यांनी आमच्या वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनीचे काम गेली पंधरा वर्षे अत्यंत निष्ठेने केले, विमा विक्रीच्या इतिहासात विमा विक्रीचा अभूतपूर्व उच्चांक प्रस्थापित केला, याबद्दल त्याना सुवर्ण-चषक देऊन त्यांचा सत्कार करण्याचे योजिले आहे. साहित्यसम्राट श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांनी अध्यक्षस्थान स्वीकारण्याचे मान्य केले आहे. या समारंभाला आपण उपस्थित व्हावे अशी विनंती आहे.

ही छापील निमंत्रणपत्रिका दहा वर्षांच्या जयश्रीनं वाचली, तेव्हा तिला फारच आनंद झाला. ही पत्रिका वाचण्यासाठी तिच्या हातात देताना तिच्या आई-मालूताई म्हणाल्या होत्या, 'या समारंभाला जायचंच बरंका आपण. तुझ्याकरिता सुंदर नवा फ्रॉक आणणार आहे मी.' जयश्रीनं निमंत्रणपत्रिका वाचली होती, आणि आनंदानं टाळ्या वाजवून म्हटलं होतं, 'बाबांचा सत्कार? काय मज्जा तरी!'... मग पत्रिकेतल्या ज्या दोन शब्दांचा अर्थ तिला समजला नव्हता त्याबद्दल तिनं आईला प्रश्न केला, 'साहित्यसम्राट म्हणजे काय ग? आणि चषक म्हणजे काय?' ...मालूताई म्हणाल्या, 'अग. चषक म्हणजे पेला. सुवर्णचषक म्हणजे सोन्याचा पेला. सोन्याचा म्हणजे सोन्याचा मुलामा दिलेला हो. आणि पेला म्हणजे पाणी पिण्याचा असतो तसा नव्हे. खूप मोठा.' त्यानी किती मोठा ते दोन्ही हातांनी दाखविलं...जयश्रीनं विचारलं, 'बाबांना बक्षीस मिळणार?' ...मालूताई म्हणाल्या,

'होय, मग आपण तो बैठकीच्या खोलीत एका टेबलावर ठेवू'... जयश्रीनं विचारलं, 'आणि साहित्यसम्राट म्हणजे काय ग?'... या शब्दाचा अर्थ सांगणं सोपं नव्हतं, हे लक्षात आल्यावर मालूताई स्वतःशीच हसल्या. पण जयश्रीच्या शंकेचं उत्तर द्यायलाच हवं म्हणून त्या म्हणाल्या, 'अग, सम्राट म्हणजे राजा. आणि साहित्याचा राजा म्हणजे ज्यानं खूप खूप लिहिलं आहे, जो सगळ्या लेखकांत श्रेष्ठ आहे तो!'... जयश्री म्हणाली, 'असं होय? सगळ्या लेखकांत श्रेष्ठ हे केळकर. तू त्यांचे कोणते ग्रंथ वाचले आहेस?' या प्रश्नाचं उत्तर देणं कठीण होतं... जयश्रीनं विचारलं, 'एखादं नाटक लिहिलंय त्यांनी?'... मालूताईंनी सांगितलं, 'तोतयाचं बंड' नावाचं त्यांचं नाटक गाजलेलं आहे!' जयश्री अर्धवट स्वतःशी म्हणाली, 'असं होय?' वाचायला हवं ... केळकरांनी एखादं नाटक गाजविलेलं असेल तर त्यांचा मोठेपणा मानला पाहिजे, असं तिच्या मनात आलं. लहानपणापासून नाटकी जगाशी तिचा संबंध आला होता, कमीअधिक सुप्रसिद्ध नट तिनं जवळून बघितले होते, त्यांची गप्पांची बैठक तिनं पाहिली होती, नाटकं तर खूपच बघितली होती, या कारणांनं गाजलेलं नाटक म्हणजे मोठेपणाचं मापच वाटत होतं जयश्रीला ...मालूताई तिला म्हणाल्या, 'दर मंगळवारी 'केसरी' येतो आपल्याकडे, तो पाहातेस ना तू? त्यातले अग्रलेख केळकरच लिहितात... जयश्रीनं विचारलं, 'अग्रलेख? म्हणजे कसला लेख ग?' ...लेकीच्या त्या प्रश्नाचं उत्तर मालूताईंना चटकन सुचेना, तेव्हा जवळच्याच टेबलावर पडलेला 'केसरी'चा ताजा अंक त्यांनी उचलला, अंकाची घडी उलगडून अग्रलेखाचं पान काढलं, आणि अग्रलेखाच्या मथळ्यावर बोट ठेवून त्या म्हणाल्या, 'याला म्हणतात अग्रलेख' ...त्यांच्या उत्तराचं जयश्रीला काही फारसं महत्त्व वाटलं नसावं. ती म्हणाली, 'हा होय? मी कशाला जाते आहे त्याच्या वाटेला? केसरीच्या शेवटच्या पानावर एखादी नाटकाची किंवा सिनेमाची जाहिरात दिसली तर ती तेवढी वाचते मी. आणि अंक ठेवून देते.' ...मालूताईंनी विषयच बदलला, आणि त्यांनी विचारलं, 'यांच्या सत्काराच्या समारंभाला जायचं आपल्याला तर तुझ्यासाठी नवा फ्रॉक घ्यायचा ना? केव्हा जाऊ या बाजारात?' ...जयश्री म्हणाली,' आज संध्याकाळी शाळेतून घरी आले की जाऊ या'...

बाबासाहेब परगावी गेले होते ते परत आल्यावर जयश्रीनं आपला नवा फ्रॉक त्यांना दाखवला, तो पाहून ते म्हणाले, 'सुंदर आहे.' त्यांनी पत्नीला विचारलं, 'तू



स्वतःसाठी नवी साडी घेतलीस की नाही?' मालूताई म्हणाल्या, 'तुमच्या पसंतीनं घेणार आहे. आज संध्याकाळी वेळ काढलात तर जाऊ या बाजारात' ... जयश्रीनं बाबासाहेबांना विचारलं, 'आणि तुम्ही स्वतःसाठी नवा पोषाख केव्हा करणार?'... बाबासाहेब म्हणाले, 'अग नव्या पोषाखाची काय गरज आहे मला'? लग्नाला निघालेल्या वऱ्हाड्यासारखा नेहमीच असतो माझा पोषाख. काही लोक तर माझ्या पोषाखाची कुचेष्टा करण्यासाठी म्हणतात, हे विमाएजंट कसले नवरदेव आहेत, माहीत नाही का तुला?' ... ते हसले, मालूताई हसल्या, जयश्रीदेखील हसली.

बाबासाहेबांचा नित्याचा पोषाख म्हणजे लोकांत एक कुचेष्टेचा विषय झालेला होता खराच!

ते वर्णानं काळे-सावळे होते; पण त्यांच्या उंचनिंच शरीराचा बांधा थोराड होता. आखाड्यात शरीर कमावल्याची साक्ष देणारा होता. मिशा झुबकेदार नव्हत्या; परंतु आकडेबाज होत्या. या रुबाबदार रूपाला आणखी उठाव देण्यासारखी त्यांच्या पोषाखाची तऱ्हा होती. पायात बूट-पायमोजे (त्या काळातला शब्द वापरायचा झाला तर 'बूट-इष्टाकण्या'!), कमरेला रेशीमकाठी धोतर, अंगात लांब कोट आणि जाकीट, जाकिटाच्या खिशात ठेवलेल्या घड्याळाचा पोटावर रुळणारा सोनेरी छेडा, आणि डोक्यावर झिरमिळ्यांची गुलाबी पगडी असा थाटमाट त्याना शोभत असे खरा; परंतु काही लोक त्यांच्या त्या नाटकी रुबाबाची चेष्टा करीत असत. लोक आपली चेष्टा करतात, हे बाबासाहेबांना समजत असूनही त्यांनी आपल्या पोषाखात बदल केला नव्हता. ते आपल्या मित्रांजवळ म्हणत असत, 'लोकांचं लक्ष वेधून घेण्यासाठी असं काही तरी लोकविलक्षण करावंच लागतं. विमा कंपनीची जाहिरात चांगली झाली पाहिजे हे जसं खरं, त्याप्रमाणेच विमाएजंट म्हणजे चालती बोलती जाहिरात वाटली पाहिजे, हेदेखील खरं.'

केव्हा एकदा सत्कारसभेचा रविवार येतो, असं जयश्रीला झालं. आणि अखेर रविवार आला, संध्याकाळ झाली, तेव्हा नव्या फ्रॉकच्या थाटात मोठ्या आनंदानं ती आईवडिलांच्याबरोबर सभेला गेली. सभेच्या चालकांनी मालूताईंना व जयश्रीला व्यासपीठावर बसविलं तेव्हा जयश्रीला फारच आनंद आणि अभिमान वाटला. सभागृहातल्या श्रोत्यांकडे तोंड करून बसण्याची तिच्या आयुष्यातली ही पहिलीच वेळ होती. व्यासपीठावर उंच जागी बसलं की तुडुंब भरलेल्या श्रोत्यांच